**मे. नोबलएक्सचेंज एनव्हॉयरमेंट सोल्युशन्स, पुणे एल एल पी, पुणे गट क्रं.४४३, मौजे- अंबी, तळेगाव दाभाडे एमआयडीसी जवळ, तालूका-मावळ, जिल्हा-पुणे याठिकाणी पुणे महानगरपालिका हद्दीतून निर्माण होणा-या टाकाऊ अन्नपदार्थावर आधारित ३०० टन/दिन क्षमतेच्या प्रस्तावित बायोगॅस प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत**

मे. नोबलएक्सचेंज एनव्हॉयरमेंट सोल्युशन्स, पुणे एल एल पी, पुणे गट क्रं.४४३, मौजे- अंबी, तळेगाव दाभाडे एमआयडीसी जवळ, तालूका-मावळ, जिल्हा-पुणे .याठिकाणी पुणे महानगरपालिका हद्दीतून निर्माण होणा-या टाकाऊ अन्नपदार्थावर आधारित ३०० टन/दिन क्षमतेच्या प्रस्तावित बायोगॅस प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी शिव सोनाई मंगल कार्यालय, अंबी फाटा, मौजे अंबी, ता-मावळ, जिल्हा-पुणे सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली.

सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२१६/ २०१५, व्दारा पत्र क्रं.बीओ / जेडी / डब्लुपीसी / पीएच / बी- ३८७९, दि. ०५-०९-२०१५ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती गठन करण्यात आलीः-

१) श्री सुरेश जाधव, - अध्यक्ष
अप्पर जिल्हादंडाधिकारी, पुणे
(मा. जिल्हादंडाधिकारी, पुणे
यांचे प्रतिनिधी)

२) श्री दे. प्र. कोपरकर, - समन्वयक
उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२
मप्रनि मंडळ, पुणे

प्रकल्पाचे व्यवस्थापक भागीदार श्री न्युरियल पिझारकर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन असे सांगितले की वाढत्या औद्योगिकरण व शहरीकरणामुळे लोकांचे जवळील लहान शहरातून, त्याचप्रमाणे जवळील खेड्यातून स्थलांतर होत असून शहरातील लोकसंख्येबरोबरच नागरी कच-याची समस्या गंभीर बनली आहे. मोठ्या शहरात नागरी कच-याच्या समस्येवर आंदोलने होत आहेत. नागरी घन कच-याची शास्त्रीय विल्हेवाट लावण्यासाठी कच-याचे ओला व सुका कचरा यात जागीच वर्गीकरण होणे आवश्यक आहे.

प्रकल्पाचे व्यवस्थापक भागीदार यांनी असे सांगितले की मे. नोबलएक्सचेंज एनव्हॉयरमेंट सोल्युशन्स, पुणे एल एल पी, पुणे गट क्रं.४४३, मौजे- अंबी, तळेगाव दाभाडे एमआयडीसी जवळ, तालूका- मावळ, जिल्हा-पुणे याठिकाणी पुणे महानगरपालिका हद्दीतून निर्माण होणा-या टाकाऊ अन्नपदार्थावर आधारित ३०० टन/दिन क्षमतेच्या प्रस्तावित बायोगॅस प्रकल्प येथे कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. कंपनी सामाजिक, पर्यावरण व स्थानिक विकासास बांधिल असल्याची ग्वाही देऊन सदर प्रकल्प हा भारताच्या पंतप्रधानांनी घोषित केलेला " **स्वच्छ भारत अभियान** " पाळत असल्याची माहिती दिली. त्यांनी श्री दे. प्र. कोपरकर, समन्वयक यांना पुढील कामकाज सुरु करण्याची विनंती केली.

श्री देविदास प्रल्हाद कोपरकर, समन्वयक यांनी पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समितीच्या अध्यक्षांचे, प्रकल्प अधिका-यांचे व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली. त्यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेप्रमाणे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिसरातच पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

समन्वयक यांनी असे सांगितले की उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, मप्रनि मंडळ, पुणे कार्यक्षेत्रात असलेला मावळ क्षेत्रात प्रकल्प प्रवर्तकांचा प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी घेण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पुणे महानगर पालिकेच्या हद्दीत बाणेर येथे व गट क्रं. ४४३, मौजे - अंबी, तालुका- मावळ, जिल्हा-पुणे येथे कार्यान्वित होणार असून बाणेर, पुणे येथील प्रकल्पामध्ये टाकाऊ अन्नपदार्थाची क्रशिंग करुन स्लरी वनविली जाईल व ती स्लरी (कच्चा माल) बंद टॅकरमधून मौजे अंबी येथील प्रकल्पात आणण्यात येईल व बायो गॅसची निर्मिती करण्यात येईल.

समन्वयक यांनी असे सांगितले की, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्प प्रवर्तकांना बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

पर्यावरण अधिसुचनेनुसार स्थानिक वृत्तपत्रात एक महिना अगोदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक

आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, पुणे-२, मप्रनि मंडळ, पुणे यांनी स्थानिक दैनिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व दैनिक इंडियन एक्प्रेस यात इंग्रजीत दि. १५-०८-२०१५ रोजी जाहिर लोकहित सुनावणीची सूचना प्रकाशित केली. जाहिर सूचनेत सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखीस्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण मुल्यांकन आघात अहवालची प्रत मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, उप विभागीय अधिकारी, मावळ यांचे कार्यालय, पुणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुख्यालय, मुंबई, प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, उप प्रादेशिक कार्यालय,मप्रनि मंडळ, पुणे-२, जिल्हा परिषद, पुणे, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे, ग्रामपंचायत, मौजे - अंबी, तहसील कार्यालय-मावळ, जिल्हा - पुणे, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई. येथे सामान्य जनतेच्या अवलोकनार्थ /अभ्यासासाठी उपलब्ध करण्यात आली होती. समन्वयक यांनी असे सांगितले की सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत एकही लेखी आक्षेप उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे कार्यालयास प्राप्त झालेला नाही. मात्र उपस्थित असलेल्यांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना करण्याची संधि देण्यात आली असून ती लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे श्री कोपरकर यांनी सांगितले व पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

श्री सुरेश जाधव, अध्यक्ष, लोकसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन प्रकल्प अधिका-यांना पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती शासनाच्या व स्थानिक भाषा मराठीतूनच करण्याची सूचना केली व सर्व जनसमूहाला निर्भयतेने त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

प्रकल्पाचे पर्यावरणविषयक सल्लागार श्री चैतन्य साठे यांनी पर्यावरण विषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित

जनसमूहास दिली. सादरीकरणानंतर स्थानिकांनी त्यांचे काही प्रश्न, सूचना देण्याची सूचना मा. अध्यक्षांनी केली.

श्री महेश महाजन, राहणार- तळेगाव, यांनी स्वतः पर्यावरण क्षेत्रात काम करत असल्याची माहिती दिली. त्यांनी असे मत प्रदर्शित केले की प्रकल्प प्रवर्तक कच्चा माल (स्लरी) पुण्याहून आणणार आहेत. त्यांनी सूचविले की जर स्थानिक परिसरात निर्माण तयार होणारे टाकाऊ अन्न पदार्थ जर प्रकल्प प्रवर्तकांनी वापरले. तर त्यांचा वाहतूक खर्च वाचेल व स्थानिक परिसर स्वच्छ होईल. त्यांनी खाजगी स्थानिक संस्थांनी तळेगाव नगरपालिकेबरोबर काही वर्षांपूर्वी ओला व सुका कचरा वर्गीकरण करण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. श्री सुमेध बापट, तांत्रिक संचालक यांनी सदरहू सूचनेचे स्वागत केले व स्पष्टीकरण दिले की भविष्यात जर वर्णीकरण केलेला टाकाऊ अन्न पदार्थ स्थानिक परिसरातून उपलब्ध झाल्यास त्याचा निश्चितच विचार करण्यात येईल.

श्री कोपरकर, समन्वयक यांनी अशी माहिती दिली की मप्रनि मंडळाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या दर वर्षांतील अंदाजपत्रातील एकूण रकमेपैकी २५ टक्के रक्कम विविध पर्यावरण संरक्षण योजनांसाठी राखीव ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्या संस्थांना ओला व सुका कचरा वर्गीकरण करण्यास निधी उपलब्ध झालेला आहे.

प्रकल्पाचे व्यवस्थापक भागीदार श्री पझारकर यांनी असे मत प्रदर्शित केले की पुणे महानगरपालिका ५४ टक्के नागरी घन कच-याचे ओला व सुका कच-यात योग्य प्रकारे वर्गीकरण करते. त्याचा अभ्यास येथील स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावा.

श्री जितेंद्र भोसले, सदस्य, अंबी ग्रामपंचायत, राहणार-अंबी गाव यांनी असे मत प्रदर्शित केले की प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमधून औद्योगिक सांडपाणी निर्माण होणार असून प्रकल्प प्रवर्तक ते प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी बाणेर येथील प्रकल्पात परत

पाठविण्याचे आश्वासन देतात. पण सदरिल प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी जर परिसरात सोडले तर जल, मृद प्रदूषण होऊ शकते. प्रकल्प अधिका-यांनी माहिती दिली की, प्रक्रिया केलेले सांडपाणी प्रकल्पातील हरित पट्टा विकास करण्यासाठीस वापर करण्यात येईल व रिक्त राहिलेले प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी बाणेर येथील प्रकल्पात पाठविण्यात येईल, त्यामुळे प्रक्रियाकृत औद्योगिक सांडपाणी प्रकल्पाबाहेर इतरत्र सोडण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री प्रदीप बनसोड, राहणार अंबीगाव यांनी प्रश्न विचारला की प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल हा बाणेरहून आणून एवढ्या लांब प्रकल्प चालू करण्याचे प्रयोजन काय आहे व स्थानिकांना संबंधित प्रकल्पाचा फायदा काय आहे. प्रकल्प प्रतिनिधी यांनी अशी माहिती दिली की परिसरातील कार्यान्वित असलेले उद्योगधंदे यांना बायो गॅस पुरवला जाऊ शकतो. त्याप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत तयार होणारे खत स्थानिक शेतक-यांना देण्यात येईल. चर्चेत प्रकल्प अधिका-यांनी असे अभिवचन दिले की ५ टक्के खत स्थानिक शेतक-यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. अध्यक्ष, पर्यावरण विषयक लोकहित जाहिर समिती यांनी सूचना केली का स्थानिक ग्रामपंचायतेस याबाबत व प्रक्रिया केलेले सांडपाणी पुनर्वापरबाबत विश्वासात घ्यावे.

श्री प्रफुल्ल शिंदे, राहणार वडवली यांनी मत प्रदर्शित केले की प्रकल्पाला लागूनच अंदाजे २००-३०० मीटर अंतरावर गोळेवाडी गाव आहे. त्या गावास या प्रकल्पामुळे ध्वनि, जल प्रदूषण व वासाचा त्रास होऊ नये. मा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर सुनावणी समिती, यांनी याबाबत प्रकल्पांनी प्रवर्तकांनी हमी देण्याची सूचना केली.

सौ.नयना रविंद्र आभाळे, अध्यक्ष, मावळ पर्यावरण संवर्धन संघ, तळेगाव यांनी असे मत प्रदर्शित केले की सदरहू प्रकल्प योग्य प्रकारे काळजीपूर्वक चालविण्यात आला, तर हा देशातील एक आदर्श प्रकल्प होऊ शकतो. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण संरक्षण योजना योग्यप्रकारे राबविण्याची हमी द्यावी.

अडव्होकेट गणेश जगताप, राहणार-तळेगाव दाभाडे यांनी असे मत प्रदर्शित केले की जर प्रकल्प प्रवर्तक स्थानिक परिसरातील

हॉटेलमधील टाकाऊ अन्न पदार्थ, कच्चा माल म्हणून वापरला तर सदरहू प्रकल्प आदर्श प्रकल्प होऊ शकतो. मात्र प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण नियम अंमलबजावणी योग्यप्रकारे करणे आवश्यक आहे.

श्री संतोष लक्ष्मण जाधव, राहणार-तळेगाव दाभाडे, अध्यक्ष, निसर्ग राजा संस्था यांनी प्रकल्पाची सध्याची क्षमता व भविष्यातील योजनेबाबत माहिती विचारली. प्रकल्प प्रतिनिधी यांनी असे सांगितले की सद्यस्थितीत ३०० टन /दिन प्रक्रिया करण्याची क्षमता पहिल्या टप्प्यात आहे. दुस-या टप्प्यात ती ५०० टनपर्यंत होईल. त्यावेळी सूचना केल्याप्रमाणे स्थानिक परिसरातील हॉटेलमधिल निर्माण होणारे टाकाऊ अन्न पदार्थ, कच्चा माल म्हणून वापरण्याचा निश्तिच विचार करण्यात येईल. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी याबाबत प्रकल्पांनी प्रवर्तकांनी हमी देण्याची सूचना केली व भविष्यात त्याप्रमाणे जिल्हा प्रशासन सहकार्य करेल याचे आश्वासन दिले. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी सदरहू प्रकल्प हा देशाला आदर्श प्रकल्प होण्याचा मानस व्यक्त केला.

अडव्होकेट जगताप, राहणार-तळेगाव दाभाडे यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी फंडातील शैक्षणिक खर्च अंदाजपत्रकातील निधिचे विवरण विचारले. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी असे मत मांडले की परिसरात ब-याच शैक्षणिक संस्था आहेत. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी फंडातील शैक्षणिक खर्च करताना अंबी गावाचाच प्रथम विचार करण्यात यावा. त्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतेस विश्वासात घ्यावे. प्रकल्प प्रतिनिधींनी सदरहू सूचनेचे तंतोतंत पाळण्याचे आश्वासन दिले.

श्री दिनेश बलसावर, राहणार-कामशेत यांनी सदरहू प्रकल्पातील तयार होणारे सेंद्रीय खत आवश्यक असल्याने प्रकल्पास पाठिंबा दिला.

श्री वामल वारंगे, राहणार-अंबीगाव यांनी विस्तारिकरणास जागा उपलब्ध आहे का ही विचारणा केली. त्याचप्रमाणे प्रक्रिया केलेले औद्योगिक सांडपाणी जमिनित जिरवू नये, साठवण टाकी आर.सी.सी. असावी, व प्रकल्प प्रवर्तक वापरणार असलेले तंत्रज्ञान योग्य आहे अशी

लेखी हमी देण्याची सूचना केली. प्रकल्प व्यवस्थापक भागीदार यांनी भारत सरकारच्या तीन संस्थांनी सदरहू तंत्रज्ञानास मान्यता दिल्याची माहिती दिली. श्री वारंगे यांनी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी बांधण्यात येणा-या क्षेत्रफळावर अतिरिक्त कर भरावा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर सुनावणी समिती यांनी नियमांप्रमाणेच कर भरण्यात यावा अशी सूचना केली.

श्री समीर जाधव, राहणार-गोळेवाडी यांनी कंपनी ५० टन खत रोज उचलणार का असा प्रश्न विचारला. कंपनी अधिकारी यांनी रोज उचलणे बंधनकारक असल्याचे माहिती दिली.

श्री संतोष दाभाडे, स्थानिक रहिवाशी यांनी असे मत मांडले की स्थानिकांमध्ये सदरहू प्रकल्पाविषयी भिती आहे. तरी निवडक स्थानिक रहिवाशी, स्थानिक पर्यावरणप्रेमी सुमारे १०-१५ यांचा संघ तयार करुन कंपनीचा बंगोलरचा प्रकल्प दाखविण्याची विनंती केली. जेणेकरुन स्थानिकांची भिती निवारण होईल.

प्रकल्पधारकास केलेल्या सूचना व सदरिल जाहीर लोकसुनावणीचा सारांश खालीलप्रमाणे आहे -

१) बैठकीत सूचना केल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक स्थानिक अंबीगावातील शेतक-यांना ५ टक्के खत उपलब्ध करण्याचे व प्रक्रिया केलेले औदयोगिक सांडपाणी विल्हेवाट करण्याची माहिती ग्रामपंचायतीस हमी देऊनच करतील.

२) बैठकीत सूचना केल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तक कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी राखीव निधी व योजना प्रथम अंबी गाव परिसरातच राबविण्याची हमी घेतील.

३) बैठकीत सूचना केल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना अंमलात आणाव्यात,

४) प्रकल्प प्रवर्तकांना राज्य शासनाच्या संबंधित विभागास पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानले व पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी प्रक्रिया पूर्ण झाल्याचे जाहिर केले.

(सुरेश जाधव)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक
जाहीर लोकसुनावणी सम्मिती
तथा
अप्पर जिल्हादंडाधिकारी ,पुणे,
जिल्हा- पुणे

सील

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE
★ PUNE ★

(दे. प्र. कोपरकर)
सदस्य, समन्वयक तथा
उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-२
मप्रनि मंडळ, पुणे

**MINUTES OF THE PUBLIC HEARING FOR PROPOSED 300.0 TPD BIO-GAS PLANT BY USING FOOD WASTE FROM PUNE MUNICIPAL CORPORATION AREA, AT GUT NO. 443, VILLAGE- AMBI, NEAR TALEGAON DABHADE MIDC, TALUKA-MAVAL, DIST – PUNE OF M/S NOBLEEXCHANGE ENVIRONMENT SOLUTIONS PUNE LLP. PUNE**

The public hearing for proposed 300.0 TPD Bio-Gas Plant by using food waste from Pune Municipal Corporation Area, at Gut No.443, Village - Ambi, Near Talegaon Dabhade MIDC, Taluka-Maval, Dist-Pune of M/s NobleExchange Environment Solutions Pune LLP. Pune was conducted on 16th September, 2015 at 11.00 am at Shiv Sonai Mangal Karyalaya, Ambi Phata, Village-Ambi, Tal-Maval, Dist-Pune.

MPCB has constituted a Committee for conducting the public hearing vide Office Order No.E-216 of 2015 under letter no.BO/JD(WPC)/PH/B-3879, dated 05—9-2015.

Following were the panel members:-

1) Shri Suresh Jadhav, - **Chairman**
   Addl. District Magistrate-Pune
   (Representative of District Magistrate-Pune)

2) Shri Devidas Pralhad Koparkar -**Convener**
   Sub Regional Officer, Pune-II
   MPCB, Pune

Managing Partner of the project Shri Nuriel Pezarkar welcomed all and informed general public that due to rapid industrialization and urbanization, the people of nearby villages have to migrate in the big cities as there are number of job opportunities. Naturally, this migration daily generates thousands of tons of Municipal Solid Waste in the cities . This has created a big problem of waste in the cities. The treatment and disposal of MSW going through a critical phase in India. Now it is the need of the time, that the waste should be treated scientifically, for this treatment, the dry and wet waste should be segregated at source only. Managing Partner of the project informed that M/s NobleExchange Environment Solutions, Pune LLP, Pune has proposed to develop 300.0 TPD Bio-Gas Plant by using food waste as a raw material from Pune Municipal Corporation Area. The proposed project will be partly executed at Block No.48, Baner, Pune in the jurisdiction of Pune Municipal Corporation Area, where crushing and slurry preparation of pre-segregated food waste received from Pune Municipal Corporation area will be prepared and the same will be carried at Gut No.443, Village -Ambi, Taluka – Maval, Dist – Pune, where the transported slurry from Baner plant will be converted into final product i.e Compressed Bio-gas. The proposed plant will convert 300.0 Tons of bio-degradable waste/food waste per day into Compressed Bio-Gas. The project is committed for the environment protection and from the manufacturing

activities until final product, we can say that the project is carrying the theme of Hon'ble Prime Minister of India **"SWACH BHARAT ABHIYAN."** He requested Convener of the meeting to start the proceedings of the meeting.

Shri Devidas Pralhad Koparkar, Convener of the said meeting welcomed the Hon'ble Chairman, company representatives, general public who were present in large number and informed that, as per the EIA Notification of Govt. of India, MoEF dated 14th September, 2006, it is mandatory to conduct the prior public hearing in the radius of 10.0 km where the project is to be installed. The Sub Regional Office, Pune-II, MPCB, Pune was in receipt of an application from project proponent M/s NobleExchange Environment Solutions Pune LLP, Pune for to conduct the public hearing for their proposed 300.0 TPD Bio-Gas Plant by using food waste as a raw material from Pune Municipal Corporation Area at Gut No.443, Village - Ambi, Taluka- Maval, Dist-Pune. The proposed project will be partly executed at Block No.48, Baner, Pune in the jurisdiction of Pune Municipal Corporation Area, where crushing and slurry preparation of pre-segregated food waste received from Pune Municipal Corporation area will be carried out and partly at Gut No.443, At Post-Ambi, Ambi-Nigade Road, Near Talegaon Dabhade MIDC, Taluka – Maval, Dist – Pune, where the transported slurry from Baner will be converted to final product Compressed Bio-gas. The proposed

plant will convert 300.0 Tons of bio-degradable waste per day into Compressed Bio-Gas.

Convener of the meeting said that as per the Notification, the proposed project falls under 7 (1) (b) category as per Schedule which requires Environment Clearance from State Environment Impact Assessment Authority (SEIAA).

Convener further informed that the aim of conducting public hearing is to make aware, local people who can be participant in the hearing and they should know the developmental activities and environment management plan of the unit. As per said Notification, one month advance public notice was published in the local newspapers in Daily Loksatta for Marathi and in The Indian Express for English on 15-08-2015 in which the general public were appealed to send their objections or suggestions if any for the proposed project.

So also a copy of EIA report and executive summery was also made available at various offices of government i.e. District Magistrate Office, Pune, Sub Regional Office, Pune-II, MPCB, Pune, Regional Office, MPCB, Pune and at Head Office of MPCB at Mumbai, Zilla Parishad, Pune, District Industries Centre, Pune, Tahsil Office, Maval, Village Ambe Grampanchayat, , Tal – Maval, Dist-Pune, Environment Department, Govt. of Maharashtra, Mumbai. The Convener further informed that, not a single objection in writing was received by the Sub

will remain clean. He informed in detail the efforts carried by the NGOs few years back with Talegaon Municipal Council of collecting and segregating dry and wet waste. Shri Sumedh Bapat, Technical Director of the project welcomed the suggestion and informed that at present the agreement is made with Pune Municipal Corporation. In future, if at all project proponent get the segregated bio-degradable waste only, they will plan to collect the raw material from local areas.

Shri Koparkar, Convener of the public hearing committee informed that MPCB has already directed the local bodies to ear-mark 25% of their total budget for protection of environment. Hence it is possible for every local body to implement the directives of segregating the dry and wet waste at source only.

Shri Nuriel Pezarkar, Managing Partner of the project informed that Pune Municipal Corporation is segregating 54% MSW at source. The local bodies of nearby areas may take the issue as case study.

Shri Jitendra Bhosale, Member, Ambi Grampanchayat , resident of Ambi village opined that though the company promises that waste water generated in the process will be sent back again at Baner for crushing, if at all it is not sent, it will be released in the nearby area which will pollute the environment. The treated waste water should not be disposed off outside the project premises. Shri Pezarkar, Managing Partner of the project informed that 36-37% of treated waste water will be used for

gardening in the company's own premises. Hence there will be shortage of treated waste water for gardening also.

Shri Pradip Bansode, resident of Ambi village asked why the project is brought long way from Baner , Pune to Ambi village where the project proponent will get the slurry as raw material. So also what will be benefit to the local people of the product. Company officials informed that the end product ie.. bio-gas will be useful to the industries located nearby the area. So also the manure which will be generated will be made available to the nearby farmers. Shri Pradip Bansode again opined that as the land is already acquired by MIDC, there is no field/land for agriculture. So also how much manure will be made available to local people. Company officials informed that 5% manure will be made available to the local people. Chairman of the Committee opined that local grampanchayat i.e. Ambi Grampanchayat should be taken into confidence regarding making available 5% manure to local people and also regarding the treated waste water disposal which will be sent back again to Baner agency. Company officials promised for the same.

Shri Prafulla Shinde, resident of Vadvali village opined that the village Golewadi is adjacent to the project i.e. 200-300 mtr. Away from the proposed project. The villagers of Golewadi should not suffer due to the noise, smell and waste water from the project. Chairman of the

committee directed project proponent to give assurance to the local people.

Mrs. Nayana Ravindra Aabhale, President of Maval Paryavarn Savardhan Sangh opined that this project may prove an idol project to our country, but the project proponent should give assurance of environment management, so that local people will get confidence.

Advocate Ganesh Jagtap, resident of Talegaon Dabhade asked if the project proponent will get the food waste from nearby hotels in future, whether it will be accepted by the project proponent or not and opined that this project may become one of the idol project if at all the guidelines of Environment Management is strictly followed.

Shri Santosh Laxman Jadhav, resident of Talegaon Dabhade and President of Nisarga Raja Sanstha asked about the present capacity and future expansion plans of the project. Project proponent informed that in the first phase 300 Ton/ Day capacity and in the II nd phase, it will increased upto 500 Ton/Day. Hence while expansion from 300 Ton/Day to 500 Ton/Day lifting of food waste of nearby areas will be definitely considered. Chairman of the Committee here again directed project proponent to give assurance that in the future expansion, the food waste of hotels of the nearby areas will be lifted with making agreement with District Administration. Chairman of the Committee further opined that this project should prove as **"Role Model"**.

Advocate Jagtap, resident of Talegaon Dabhade asked to explain the details of education buget for which the company officials promised to spent under CSR Fund. Chairman of the Committee opined that the area is self-sufficient in the field education as there are no. of education institutes in the area. The company should focus on Ambi village for developmental project and Grampanchayat Ambi should be taken into confidence. Company officials promised for the same.

Shri Dinesh Balsavar, resident of Kamshet who is local agriculturist supported the project as we are short of manure, which will be made available due to this project.

Shri Waman Warange, resident of Ambiwadi, Member of Ambi Grampanchayat asked whether the company has enough space for expansion. He opined that the waste water from the project should not be drown in the company premises also. The storage tanks should be constructed by RCC only. So also the company should give written assurance that their technology is upto the mark and will not cause any damage to the environment. Shri Pazakar, Managing Director of the project informed that the project proponent has obtained validation from the National Bio-Energy Board (NBB), Ministry of Non-Conventional Energy Sources (MNES) and NCL, Pune , which are established institutions of Govt. of India.

Shri Waman Warange, further asked whether the Grampanchayat can charge extra taxes on the project after expansion for their additional construction. Chairman of the Committee opined that as per the provisions in the Law, the project proponent should pay the grampanchayat tax.

Shri Sameer Jadhav, resident of Golewadi asked whether the company will lift 50.0 ton manure every day after production. Project Proponent informed that the manure will be lifted on daily basis. So there is no possibility of smell nuisance.

Shri Santosh Dabhade, local resident opined that the local villagers are afraid of the pollution and smell nuisance due to this project and suggested that project proponent should give an opportunity to team of local people, local environmentalist to visit the Bangalore plant of the project proponent to avoid the fear of the local people.

After detailed discussions, it is suggested as under –

1) The project proponent will take the Grampanchayat Ambi in confidence while making available 5% manure to local people and also disposal of treated waste water by sending to Baner Plant, Pune;

2) As promised, the company will carry out the activities under CSR Fund. The detailed information of CSR fund will be mentioned in the report. So also while executing the developmental project under CSR , the priority will be given to Ambi Village.

3) The project proponent will implement Environment Management Plan as promised;

4) The company is allowed to approach to State Environment Impact Assessment Authority (SEIAA) for obtaining Environmental Clearance.

Chairman of the Committee thanked all government officials, company officials and particularly general public who attended the meeting.

The meeting ended extending thanks of the Chair.

Seal

(Suresh Jadhav)
Chairman of the Committee
&
Addl. District Magistrate, Pune,
Dist – Pune

(D. P. KOPARKAR)
Member, Convener of the Committee
&
Sub Regional Officer, Pune-II,
MPCB, Pune